अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व स्त्रियांकरिता राखून ठेवावयाच्या जागांच्या संख्येची गणना करताना ०.५० हा अपूर्णांक पुढील संख्येस पूर्णांकित करणेबाबत.

सत्यमेव जयते

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ/मनपा-२०२१/प्र.क्र.२१ /का.५
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग,मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १० फेब्रुवारी, २०२२.

## आ दे श

ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाने समक्रमांकाच्या दिनांक २८ डिसेंबर, २०२१ च्या आदेशान्वये महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक त्रिसदस्यीय प्रभाग रचनेनुसार (सदस्य संख्या, प्रभाग रचना व आरक्षण) आदेश, २०२१ अन्वये महानगरपालिकांच्या निवडणुकांकरिता सदस्य संख्या ठरविणे, प्रभाग रचना करणे व आरक्षण चक्रानुक्रमे फिरविणे याकरिता सविस्तर आदेश काढण्यात आले आहेत.

२. आणि ज्याअर्थी, अपूर्णांक आल्यास सदस्य संख्येची गणना करणेबाबत राज्यातील महापालिकांकडून आयोगाकडे मार्गदर्शन मागविण्यात येत आहे. याकारणास्तव सदर आदेशासोबतच्या परिशिष्ट-१ (सदस्य संख्या व आरक्षणाची परिगणना) मध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या सदस्यांची गणना करताना अपूर्णांक आल्यास त्याची गणना कशी करावी, याबाबत उल्लेख करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे महिला सदस्यांची गणना करताना अपूर्णांक आल्यास त्याची गणना कशी करावी, याबाबतही उल्लेख करणे आवश्यक आहे.

३. आणि त्याअर्थी, मी, यु.पी.एस. मदान, राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ झेडए व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १४ नुसार मिळालेल्या व इतर अधिकारांचा वापर करून आदेश देत आहे की,

**अ) अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या सदस्यांची गणना करताना ०.५० हा अपूर्णांक पुढील संख्येस पूर्णांकित करण्यात यावा, तर त्यापेक्षा कमी असलेला अपूर्णांक दुर्लक्षित करण्यात यावा.**

ब) या (अ) येथील आदेशाच्या अनुषंगाने दि. २८/१२/२०२१ रोजीच्या आदेशासोबत जोडलेल्या परिशिष्ट-१ (सदस्य संख्या व आरक्षणाची परिगणना) मधील “टीप” खालीलप्रमाणे सुधारण्यात येत आहे:-

**“टीप :- अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व स्त्रियांकरिता राखून ठेवावयाच्या जागांच्या संख्येची गणना करताना ०.५० हा अपूर्णांक पुढील संख्येस पूर्णांकित करण्यात यावा.”**

(यु. पी. एस. मदान)
राज्य निवडणूक आयुक्त,
महाराष्ट्र

प्रति,

१. अपर मुख्य सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई:- ४०० ०३२.
२. सर्व विभागीय आयुक्त
३. सर्व जिल्हाधिकारी
४. सर्व महानगरपालिका आयुक्त (बृहन्मुंबई वगळून)
५. मा. सर्वोच्च न्यायालय, व मा. उच्च न्यायालयातील राज्य निवडणूक आयोगाचे वकील
६. आयोगातील सर्व कार्यासने
७. निवड नस्ती.